# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग
मा. स्थायी समिती सभा दि. ०६/०९/२०१९.

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ९४ :- विविध कामांच्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) क्राँक्रीट रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे.
(अंदाजित रक्कम रू. ५,००,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| १) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा १.८९% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १.८९% जास्त दराने |
| २) मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ७.२०% जास्त दराने |
| ३) मे. देव इंजिनिअर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ९.००% जास्त दराने |

२) प्रभाग समिती क्र.०६ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरीता आवश्यक त्या ठिकाणी जलवाहिनी अंथरणे.
(अंदाजित रक्कम रू. २,००,००,०००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा ५.९०% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ३.५०% जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता पाहता अ.क्र. १ च्या कामांकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** व अ.क्र. २ कामाकरीता **मे. गणेश डेव्हलपर्स** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)

कार्यकारी अभियंता (पा.पु.)
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. २८१९२८२८

## // गोषवारा//

**मा. स्थायी समिती दि.०६/०९/२०१९**

**प्रकरण क्र १०१ :- महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व), भाईंदर (पश्चिम) व मिरारोड ते चेणा या विभागातील बाजार लिलावाकरीता ई-ऑक्शनद्वारे प्राप्त झालेल्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत..**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर (पुर्व), भाईंदर (पश्चिम) व मिरारोड ते चेणा विभागातील बाजार वसुली करीता ई-ऑक्शनद्वारे बाजार लिलाव दि.०३/०८/२०१९ रोजी ऑनलाईन जाहिर केलेला होता. दि.१९/०७/१९ ते दि.३१/०७/१९ या कालावधीत ऑनलाईन अर्ज स्विकारणे तसेच कागदपत्रे सादर करणेबाबत प्रसिध्दी देण्यात आली होती. त्यानुसार खालील अभिकर्ता (एजंट) यांनी भाग घेतला होता.

**१) मे. आदित्य इंटरप्राईजेस**
**२) विजय गजाधर सोमानी**
**३) मे. अमरसिंग जाधव**

या ठेकेदारांनी दि.०३/०८/२०१९ रोजी लिलावाची बोली करण्यात आली रु. ६,८३,९५,५१४/- पासून रु.२५,०००/- च्या टप्प्याने बोली करण्यात आली तथापी मे. अमरसिंग जाधव यांना काही तांत्रिक अडचणीमुळे ई-ऑक्शनमध्ये बोली लावता आली नाही. परंतु देकाराची रक्कम रु.६,८३,७०,५१४/- या रकमेस ठेका घेण्यास तयार असलेबाबतचे पत्रान्वये कळविले आहे. परंतु रु.२५,०००/- च्या टप्पाने बोली मध्ये वाढ होऊन रु. ६,८४,२०,५१४/- पर्यंत बोली खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | लिलावाची रक्कम |
|---|---|---|
| १. | मे. आदीता इंटरप्राईजेस | ६,८४,२०,५१४/- |
| २. | विजय गजाधर सोमानी | ६,८३,९५,५१४/- |
| ३. | मे. अमरसिंग जाधव | ६,८३,७०,५१४/- |

तरी ई-ऑक्शनद्वारे मे.आदीता इंटरप्रायजेस यांनी इतर अभिकर्तापेक्षा (एजंट) जास्त बोली केलेली आहे. सदर निविदाधारक यांना दर वाटाघाटीसाठी बैठकीस निविदा समिती समोर बोलवुन रु.६,८६,५०,५१४/- हि बाजार फी रक्कम निश्चित करण्यात आली. त्यास मे. आदिता इंटरप्रायजेस यांनी संमती दिली. सदरची रक्कम निश्चित देकार रकमेपेक्षा रु.२,८०,०००/- ने जास्त आहे.

मे. आदीता इंटरप्रायजेस यांची रु.६,८६,५०,५१४/- निविदा समितीने अंतिम केलेल्या दरास व १ वर्षाच्या कालावधी करीता बाजार वसुलीचे कार्यादेश देणेकरीता मा. स्थायी सभेची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

तसेच यापुर्वी भाईंदर (पुर्व), भाईंदर (पश्चिम) व मिरारोड ते चेणा विभागाच्या बाजार वसुलीचा ठेका दि.०९/१०/२०१७ ते दि.०८/१०/२०१८ या कालावधीकरीता १ वर्षासाठी देण्यात आलेला होता. तद्‌नंतर मा. स्थायी समिती ठराव क्र.१४० दि.२९/१२/२०१८ अन्वये दि.०९/१०/२०१८ ते दि.०५/०४/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. दि.१६/०२/२०१९ रोजी मा. आयुक्त यांच्या मान्यतेने बाजार फी वसुलीचे उत्पन्न वसुली करीता मागील अभिकर्ता (एजंट) यांना दि.०६/०४/२०१९ ते पुढील निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत मुदतवाढ देऊन मागील निवदेतील मंजुर दरामध्ये १० टक्के रक्कम नैसर्गिक वाढ करुन बाजार फी वसुलीचे कामकाज सुरु ठेवलेले आहे. त्या कामकाजासाठी मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ. संभाजी पानपट्टे)
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने